## अध्यक्षा, नगरपरिषद यांजकडून

## पांचगणी नगर परिषद, पांचगणी, तालुका महाबळेश्वर, जिल्हा सातारा

संदर्भ.-- (१) सन २०१५ चा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश क्रमांक ५.

(२) मा. शासन नगर विकास विभाग, शासन निर्णय, नगर विकास विभाग क्रमांक एमसीओ-२०१५/प्र. क्र. १८९/नवि-१४, दिनांक २३ जून २०१५.

क्रमांक वशि-१२/५७९/२०१६-१७.— महाराष्ट्र शासन निर्णय नगर विकास विभाग क्रमांक एस.सी.ओ.-२०१५/प्र. क्र. १८९/नवि-१४, दिनांक २३ जून २०१५ च्या अधिसूचनेनुसार राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५, दिनांक २८ एप्रिल २०१५ रोजी लागू करण्यात आलेला आहे. सदर अध्यादेशातील कलम ३ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार पाचगणी नगरपरिषद या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत देण्यात येणाऱ्या विविध सेवा सुविधांपैकी नागरिक केंद्रबिंदू मानून, नागरिकांना दैनंदिन जीवनामध्ये सातत्याने आवश्यक असणाऱ्या व ज्या लोकसेवांचा जास्तीत जास्त नागरिकांनी फायदा घेतला आहे व ज्या सेवा महत्त्वाच्या आहेत अशा सेवा अध्यादेशाच्या कलम ३ अन्वये क-वर्ग नगरपरिषद पाचगणी नगरपालिका यांनी जाहीर करावयाच्या लोकसेवेची सूची, आवश्यक कागदपत्रे, फी, नियतकालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी, द्वितीय अपिलीय प्राधिकारी इत्यादी आवश्यक माहितीचा तपशील खालीलप्रमाणे.--

### महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश - २०१५

| अ. क्र. | लोकसेवांची सूची | आवश्यक कागदपत्रे | न.पा. मार्फत आकारल्या जाणाऱ्या फीचा तपशील | नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय प्राधिकारी | द्वितीय अपिलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | जन्म प्रमाणपत्र देणे | विहित नमुन्यातील अर्ज | नक्कल फी रु. ५०.०० शोधनावळ फी चालू वर्षी सोडून (प्रती वर्ष) रु. १०. | ३ दिवस | जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ अन्वये प्राधिकृत अधिकारी (संबंधित विभागप्रमुख). | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| २ | मृत्यू प्रमाणपत्र देणे | विहित नमुन्यातील अर्ज | नक्कल फी रु. ५०.०० शोधनावळ फी चालू वर्षी सोडून (प्रती वर्ष) रु. १०. | ३ दिवस | जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ अन्वये प्राधिकृत अधिकारी (संबंधित विभागप्रमुख). | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ३ | विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे. | १. विहित नमुन्यातील फॉर्म-ड. २. प्रतिज्ञापत्र रु. १०० चे कोर्ट फी स्टँप. ३. जन्म दाखला/रेशन-कार्ड/रहिवास पुरावा/ वधू-वराचे प्रत्येकी ४ आयकार्ड फोटो/लाईट बिल/फोन बिल/पासपोर्ट कॉपी. | ९० दिवसांपर्यंत रु. २५०. १ वर्षाच्या आत रु. ३५० व एक वर्षाच्या नंतर ५०० रु. | ३ दिवस | विवाह नोंदणी अधि-नियम, १९९८ अन्वये प्राधिकृत अधिकारी (संबंधित विभागप्रमुख). | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ४ | मालमत्ता कर उतारा देणे. | विहित नमुन्यातील अर्ज | रु. ५० | ३ दिवस | संबंधित विभागप्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ५ | थकबाकी नसल्याचा दाखला देणे. | विहित नमुन्यातील अर्ज | रु. ५०० | ३ दिवस | संबंधित विभागप्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश - २०१५--चालू

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | (अ) दस्तऐवजांच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज व इतर आवश्यक कागदपत्रे.<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला.<br>३. दस्तऐवजाची प्रत (खरेदीखत/बक्षीसपत्र/ वाटणीपत्र व इतर). | खरेदी असल्यास खरेदी मूल्यांच्या १ टक्के. | १५ दिवस | संबंधित विभागप्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| | (ब) वारसाहक्काने मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज व इतर आवश्यक कागदपत्रे.<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला.<br>३. वारसाहक्क प्रमाणपत्र | वारस नोंद असल्यास रु. १००० | १५ दिवस | संबंधित विभागप्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ७ | झोन दाखला देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज.<br>२. ७/१२ उतारा, सिटी सर्व्हे उतारा.<br>३. मोजणी नकाशा/ सिटी सर्व्हे नकाशा. | रु. १००० | ७ दिवस | संबंधित विभागप्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ८ | भाग नकाशा देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज.<br>२. ७/१२ उतारा, सिटी सर्व्हे उतारा.<br>३. मोजणी नकाशा/ सिटी सर्व्हे नकाशा. | प्रती ए-४ साईज कृष्णधवल रु. ३०० प्रती ए-४ साईज रंगीत रु. ५०० | ३ दिवस | संबंधित विभागप्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ९ | बांधकाम परवाना देणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज.<br>२. वास्तुविशारदाचा दाखला<br>३. मालकीहक्काची कागदपत्रे.<br>४. बांधकाम आराखडा नकाशा-५ प्रती.<br>५. मोजणी नकाशा<br>६. मंजूर रेखांकनाची प्रत | बाजार मूल्य तक्त्यावर अवलंबून. | ६० दिवस | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| १० | जोते प्रमाणपत्र | १. विहित नमुन्यातील अर्ज.<br>२. बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र. | ५० प्रती चौ. मी. | ३० दिवस | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ११ | भोगवटा प्रमाणपत्र देणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज.<br>२. बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र.<br>३. जोते प्रमाणपत्र<br>४. घरमालक/वास्तु-विशारद यांचे पूर्णत्वाचे स्वयंघोषणापत्र. | रु. १००० | ३० दिवस | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालयीन अधीक्षक | मुख्याधिकारी |

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश - २०१५--चालू

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | नळजोडणी देणे | न. पा. हद्दीतील पाणीपुरवठा म.जी.प्रा.द्वारे केला जातो. | | | | | |
| १३ | जलनि:स्सारण जोडणी देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज. २. जागा मालकी कागदपत्रे ३. प्रतिज्ञापत्र ४. थकबाकी नसल्याचा दाखला. | १. रहिवास कारणासाठी रु. २०००. २. वाणिज्य कारणासाठी रु. ५००० | | | | |

सौ. लक्ष्मी कऱ्हाडकर,

अध्यक्षा,

पांचगणी गिरीस्थान नगरपरिषद,

तालुका महाबळेश्वर, जिल्हा सातारा.

सातारा, ७ मार्च २०१७.

---

उपसंचालक, भूमी अभिलेख यांजकडून

*मुंबईचा धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणेबाबत व त्यांचे एकत्रीकरण करणेबाबत अधिनियम, १९४७.*

*अधिसूचना*

क्रमांक एकक-३१३ (सांगली ) पुणे/७९/एसआर-२१/२०१०.—मौजे करगणी, तालुका आटपाडी, जिल्हा सांगली येथील जमीन एकत्रीकरण योजना दिनांक ३१ मार्च १९७९ रोजी कायम करण्यात आलेली होती. सदरबाबत महाराष्ट्र शासनाचे राजपत्र, भाग एक पुरवणीमध्ये पृष्ठ ४६ वर योजना कायम करण्यात आल्याबाबतची अधिसूचना दिनांक २० सप्टेंबर १९७९ रोजी प्रसिद्ध झाली होती. सदरच्या मंजूर दुरुस्ती योजनेत बदल करणे आवश्यक असल्याची खात्री झाल्यामुळे मंजूर एकत्रीकरण योजनेतील खाते नंबर १३९१, गट नंबर २९६७ (नवीन) दुरुस्तीबाबतच्या मसुद्यास उपसंचालक, भूमी अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे यांनी मान्यता देऊन तो कायदा कलम ३२ *(१)* अन्वये प्रसिद्धीसाठी जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, सांगली यांचेकडे पाठविण्यात आला होता, तो त्यांनी पुढील नियमानुसार कार्यवाहीसाठी दिनांक ९ मे २०१६ रोजीच्या पत्राने उपअधीक्षक, भूमी अभिलेख, आटपाडी यांना पाठविला होता. उपअधीक्षक, भूमी अभिलेख, आटपाडी यांनी सदरचा मसुदा तहसीलदार व गावकामगार तलाठी यांचेकडे प्रसिद्धीकामी दिनांक ३ जून २०१६ चे पत्राने पाठविला होता. तो तहसीलदार, आटपाडी यांनी दिनांक ४ जून २०१६ रोजी तहसीलदार कार्यालयाचे नोटीस बोर्डावर व गावकामगार तलाठी यांनी दिनांक ६ जून २०१६ रोजी गावी प्रसिद्ध केलेला होता.

सबब, मुंबईचा धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणेबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ चे कलम ३२, पोट-कलम *(३-अ)* मधील तरतुदीनुसार उपसंचालक, भूमी अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे मंजूर योजनेतील खाते नंबर १३९१, गट नंबर २९६७ (नवीन) मध्ये फेरफार करून दुरुस्ती योजनेचा मसुदा कायम करीत आहेत.

गिरीश राव,

उपसंचालक, भूमी अभिलेख,

पुणे प्रदेश, पुणे.

पुणे, १९ जानेवारी २०१७.

---

मुख्य कार्यकारी अधिकारी यांजकडून

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे

*झोपडपट्टी पुनर्वसन आदेश*

क्रमांक झोपुप्रा/तां. १/झोपुआ/प्र.क्र. १६३/४०३/२०१७.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे सोयीकरिता "उपरोक्त अधिनियम" असा करणेत येत आहे) चे कलम ३-अ *(१), (२)* अन्वये पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्रमांक झोपुयो-२००४/प्र. क्र. २१३/ झोपसु-१, दिनांक ३० जून २००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नेयुक्ती केली आहे आणि आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांना उक्त प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून प्राधिकृत केले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३-ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दिनांक १ डिसेंबर २००५ रोजी अंतिमत: प्रसिद्ध करण्यात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी विकसक मे. गोल्डन प्रमोटर्स अँड डेव्हलपर्स यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दिनांक २१ सप्टेंबर २०१२ रोजी प्रस्ताव दाखल केलेला आहे.

प्रस्तावाच्या अनुषंगाने उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी सि.स.नं. ३१६४ ते ३२०८ (स. नं. १६-अ/२), बोपोडी, पुणे या जागेवरील झोपडपट्टीचे सर्वेक्षण करून उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार झोपडीधारकांची पात्रता निश्चित केलेली आहे. उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी दिनांक २३ मार्च २०१५ अन्वये सादर केलेल्या परिशिष्ट-२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सदर जमिनीवर एकूण ६१ झोपड्या असून त्यापैकी पात्र निवासी ३६, पात्र बिगरनिवासी २ व संयुक्त ० असे एकूण ३८ झोपडीधारक पुनर्वसनास पात्र ठरलेले आहेत. १६ निवासी झोपडीधारक व १ बिगरनिवासी झोपडीधारक अपात्र ठरले असून बंद निवासी घरे ६ झोपड्या अपात्र ठरल्या आहेत. झोपडीधारकांपैकी ३६ झोपडीधारकांनी (९४.७३ टक्के) मे. गोल्डन प्रमोटर्स अँड डेव्हलपर्स यांना पुनर्वसन योजनेसाठी संमती दिलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असल्याने व ती घोषित नसलेमुळे महापालिका सहायक आयुक्त, औंध क्षेत्रीय कार्यालय, पुणे महानगरपालिका यांनी झोपडपट्टीसदृश परिस्थिती असलेचा अहवाल कार्यालयीन पत्र जा. क्र. ६४३०, दिनांक २९ नोव्हेंबर २०१३ रोजी सादर केला असलेमुळे सदरचे क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी, महेश झगडे, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३-क *(१)* अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये अनुसूचीत नमूद केलेले क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे.

सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस आदेश प्रसिद्ध झाल्यापासून चार आठवड्यांच्या आत महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३-क *(२)* अन्वये विशेष न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करता येईल आणि विशेष न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम राहील.

अनुसूची

| जमिनीचा तपशील | क्षेत्र |
| --- | --- |
| १ | २ |
| | चौ. मी. |
| सि.स.नं. ३१६४ ते ३२०८ (स. नं. १६-अ/२), बोपोडी, पुणे. | १८७२.७ |

चतु:सीमा

पूर्वेस.-- सि.स.नं. ३१५७, बोपोडी.

पश्चिमेस.-- सरकारी रस्ता व सि.स.नं. ३२२१, बोपोडी.

उत्तरेस.--सरकारी रस्ता, एल्फिस्टन रस्ता.

दक्षिणेस.-- सि.स.नं. ३२२१ आणि ३२०९, बोपोडी

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देण्यात आला.

**महेश झगडे,**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे.

पुणे, ६ एप्रिल २०१७.

---

BY DISTRICT AND SESSIONS JUDGE

Order

No. B-2/2545/1997.-- Shri. N. H. Harale, Civil Judge, Junior Division, Tasgaon is granted Earned leave for 6 days from 16th June 1997 to 21st June 1997 with permission to prefix holidays on IInd Saturday on 14th June 1997 and Sunday on 15th June 1997 and suffix holiday on Sunday, 22nd June 1997.

No locum tenens is necessary.

Certified under Note–2 below Rule 39 of Maharashtra Civil Services (Pay) Rules, 1981 that